(रक्कम रु. ५००/- च्या स्टॅम्पपेपरवर व नोटाराईज्ड करणे)

(शासन निर्णय क्र. टीपीएस १८१४/प्र.क्र. ८२/१४/नियम/नवि-१३, दि. ०७/१०/२०१७ च्या प्रशमित संरचनाच्या अनुषंगाने जागामालकाने / प्रस्तावधारकाने दाखल करावयाचे हमीपत्र.)

मी. ........................................., वय ......... वर्षे, धंदा ............................., राहणार ..................................................................................................................................................... कारणे सत्यता पत्र लिहुन देतो की,

मी या ठिकाणी पुणे महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये खालीलप्रमाणे पुर्व परवानगी न घेता अनधिकृत बांधकाम केलेले आहे.

अनधिकृत बांधकामाचे ठिकाणाचा पत्ता – ................................................................................ .....................................................................................................................................

अनधिकृत बांधकामाचे स्वरुप व क्षेत्रफळ – ................................................................................ ..................................................................................................................................... ..................................................................................................................................... .....................................................................................................................................

(अनधिकृत बांधकाम स्वतंत्र प्लॉटवर केलेले आहे / गृहरचनामधील फ्लॅट अथवा दुकानाच्या स्वरुपात आहे/पॅसेज, बाल्कनी, टेरेस इत्यादी अनधिकृतपणे बंदिस्त केलेले/विहित परवानगी न घेता वापरात बदल केलेला आहे/मजले / सदनिका वाढ केलेली आहे इत्यादी तपशिल सविस्तरपणे इमारतीच्या नावासह नमुद करावा)

सदरहू अनधिकृत बांधकाम शासन निर्णय क्र. टीपीएस १८१४/प्र.क्र. ८२/१४/नियम/नवि-१३, दि. ०७/१०/२०१७ नुसार प्रशमन आकार लावून, प्रशमित संरचना म्हणुन घोषित करण्यासाठी मी पुणे महानगरपालिकेकडे प्रस्ताव दाखल केलेला आहे. या प्रस्तावाची तांत्रिक तपासणी ला. आर्किटेक्ट / ला. इंजिनियर श्री ......................................................., नोंदणी क्र. ................................., पत्ता ........................................................................................... यांनी करुन पुढील मान्यतेसाठी प्रस्ताव सादर केलेला आहे.

१) सदर मिळकत ही कायदेशीर दृष्टया माझया मालकीची व वहिवाट हक्काची असून त्यावर अन्य कोणाचाही कायदेशीर हक्क नाही किंवा मालकी हक्कांबाबत कोणतेही वाद नाहीत तसेच कोणत्याही न्यायालयात कोणत्याही प्रकारचा दावा मालकी हक्कांच्या अनुषंगाने प्रलंबित नाहीत. मालकी हक्कांसाठी मी ....................................................................... ही कागदपत्रे सादर केलेली आहेत.

२) या मिळकतीच्या हद्दी या नकाशात दाखविल्याप्रमाणे सर्व्हे नंबर व पोट हिश्शासह असून लगतच्या हद्दी सर्व्हे नंबर व पोट हिश्शासह नकाशांत दर्शविले आहे. सदर हद्दीची निश्चिती मिळकतीची मोजणी क्र. मो.रं.नं. ..................., दि ................... अन्वये विहित होत आहे.

३) या मिळकतीवर यापुर्वी पुणे मनपामार्फत कोणत्याही कारणाने बांधकाम परवानगी रद्द करण्याची कारवाई झालेली नाही. त्याप्रमाणे मालकी हक्काबाबत, वहिवाटीबाबत, पुणे मनपाने दिलेल्या कोणत्याही नोटीसीच्या अनुषंगाने कोणत्याही न्यायालयात दावा प्रलंबित नाही. तसेच पुणे मनपाने सदर मिळकतीस कोणतीही नोटीस बांधकाम परवानगीच्या अनुषंगाने अथवा अन्य कोणत्या कलमाव्दारे दिलेली नाही. नोटीस दिलेली असल्यास त्याचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे :-

..............................................................................................................

..............................................................................................................

..............................................................................................................

..............................................................................................................

४) सदर मिळकत नागरी जमिन कमाल धारणा अधिनियम १९७६ च्या कलम २०, २१ अथवा अतिरिक्त क्षेत्र घोषित झालेल्या किंवा शासनाकडून ताब्यात घेण्यात आलेल्या किंवा शासनास देय असलेल्या क्षेत्राचा भाग नाही. याबाबत नागरी जमिन कमाल धारणा अधिनियम १९७६ च्या अनुषंगाने स्वतंत्रपणे शपथपत्र व बंधपत्र सादर केलेले आहे.

५) सदर प्रस्ताव दाखल करतांना शासन निर्णय क्र. टीपीएस १८१४/प्र.क्र. ८२/१४/नियम/नवि-१३, दि. ०७/१०/२०१७ मधील सर्व कलमांचे मी अवलोकन केलेले असून या कलमांच्या अनुषंगाने माझे अनधिकृत बांधकाम प्रशमन आकार लावून प्रशमित संरचना म्हणून घोषित होवू शकते याची खातरजमा मी व ला. आर्कि. / ला. इंजिनियर यांनी स्वतः केलेली आहे.

६) सदरहू अनधिकृत बांधकाम प्रशमन आकार लावून प्रशमित संरचना म्हणून घोषित झाल्यानंतर सदर मिळकतीवर कोणत्याही प्रकारे पुढील बांधकाम परवानगी विकसनाच्या अनुषंगाने मिळणार नाही. या शासन निर्णयातील कलम १२ ची मला माहिती असून सदर बाब मला मान्य आहे.

उपरोक्त प्रमाणे सर्व बाबींची हमी या हमीपत्राव्दारे मी देत असून याबाबत कोणतीही आक्षेपार्ह बाब आढळल्यास पुणे मनपामार्फत या प्रस्तावाबाबत करण्यात येणारी कारवाई मला मान्य असेल व याबाबत कोणतीही तोशिष पुणे महानगरपालिकेस लागू देणार नाही. उपरोक्त मुद्दयांबाबत आणि दाखल कागदपत्रांच्या सत्यतेबाबत मी सर्वस्वी जबाबदार राहील.

ठिकाण - पुणे
दिनांक - / /

..........................................

मालकाचे नाव व स्वाक्षरी